**फौजदारी किरकोळ अर्ज क्रं.५१/२०२४.**
**निशाणी क्रं.१.**

## सत्यापन (Verification)

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**साक्षीदार क्र.१ : माझे नाव : दिलीप विठ्ठल काळाणे,**
वय ५८ वर्षे, धंदा : शेती,
राहणार : धालेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे.

मी गैरअर्जदार नामे भाऊसाहेब विश्वनाथ राक्षे यांच्याकडून रुपये ४,००,०००/- घेवून त्यांना माझी धालेवाडी येथील गट नं. ६६२ संदर्भात एक वर्षाचे गहाण स्वरुपी मुदत खरेदीखत सन २००९ मध्ये करुन दिले होते. सदरील रकमेवर दरमहा ५ टक्के इतके व्याजदर दयायचे ठरले होते. सदरील रक्कम व त्यावरील व्याजदर हे मला एक वर्षाच्या आत फेडता आले नाही. सदरील रकमेकरीता गैरअर्जदार याने माझेकडे तगादा लावला होता. परंतु, माझेकडे त्यावेळी सदरील रक्कम नसल्याने त्याने मला मुदतवाढ करुन देतो त्यासाठी तुम्ही सासवड येथे दुयम निबंधक ऑफिस येथे बोलविले. सन २०१० मध्ये मी ऑफिसला गेलो असता तेथे त्यांनी एक दस्त तयार करुन ठेवला होता व मी तेथे गेलो असता त्याने मला सदरील दस्त मुदतवाढीचा आहे असे सांगून मला त्यावर स्वाक्षरी करण्यास सांगितले व मी स्वाक्षरी केली. सदरील दस्तात नमूद केलेले चेक हे त्यांनी माझेकडून व माझे वडिलांकडून सहया करुन त्यांच्याकडे परत घेतले. त्यानंतर आम्ही घरी गेलो. त्यानंतर ०४ महिन्यांनी मी जेव्हा माझे गट नं. ६६२ चा ७/१२ उतारा काढला असता मला कळाले की, सदरील ७/१२ वर त्या गैरअर्जदाराचे नाव लागलेले आहे व माझे नाव कमी झालेले आहे. त्यासंदर्भात माझी फसवणुक झाली म्हणून मी जेजुरी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली.

**फौजदारी किरकोळ अर्ज क्रं.५१/२०२४.**
**निशाणी क्रं.१.**

तसेच, त्याबाबतीत मी त्याचेविरुद्ध दिवाणी न्यायालय, सासवड येथे दावा दाखल केला. त्यातदेखील तो व त्याचे वकील येत नाही. सदरील दावा प्रलंबित आहे. अशा पद्धतीने गैरअर्जदाराने माझी फसवणुक केल्याने आरोपीस कडक शासन व्हावे ही विनंती.

सत्यापन पुर्ण.

दि. वि. कळाणे
.....................................
(सत्यापन करणाराची सही)

''समक्ष''

दिनांक : २७/०९/२०२४.

**(श्री. एम. एस. भरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सासवड.